**फौजदारी किरकोळ अर्ज क्रं.४०/२०२४.**
**निशाणी क्रं.१.**

## सत्यापन (Verification)

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**साक्षीदार क्र.१ : माझे नाव : विनायक दशरथ म्हस्के,**
वय ७१ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त/शेती,
राहणार : सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे.

घटना ही दि.०८/०१/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते ११.१५ वाजणेचे सुमारास गट नं.४३८ मौजे कोळविहिरे, ता.पुरंदर येथे आमच्या शेतामध्ये घडली. सदरील दिवशी, ठिकाणी व वेळी आम्ही शेतीच्या कामासाठी गेलो असता त्याठिकाणी गैरअर्जदार क्रं.१ व २ नामे अनुक्रमे शेखर जालिंदर खैरे व जालिंदर मारूती खैरे हे तेथे आले व आम्हास म्हणाले की, आमच्या गटाची मोजणी चालू आहे तर तुम्ही नोटीसीवर सह्या करा. त्यावर मी त्यांना मला सरकारी नोटीस नसल्यामुळे मी नोटीसीवर सही करू शकणार नाही असे म्हणले असता त्यांनी मला शिविगाळ करण्यास चालू केले व तुम्ही येथे शेती कशी करता तेच बघतो, तुमचे हातपायच मोडतो असे म्हणून दमदाटी केली. त्यानंतर ते तेथून निघून गेले. त्यानंतर मी दि.११/०१/२०२४ रोजी जेजूरी पोलिस स्टेशन येथे पोस्टामार्फत अर्ज पाठविला. परंतू त्यांनी त्यावर काहीही कारवाई केली नाही. त्यामुळे मी न्यायालयामध्ये सदरील अर्ज दाखल केलेला आहे. तरी आरोपीस कडक शासन व्हावे ही विनंती.

सत्यापन पुर्ण.

.....................................
(सत्यापन करणाराची सही)

"समक्ष"

**(श्री. एम. एस. भरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सासवड.

दिनांक : ०२/०४/२०२४.